# नगर परिषद कार्यालय दिग्रस जि. यवतमाळ

क्रमांक/प्रशासन/नपदि/६१५/२०२५ दिनांक १८/२/२०२५

Email: npdigras@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०७२३४-२२२०५९

## जाहीर प्रसिद्धी

राज्यातील पात्रव्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्या करिता तसेच लोकाच्या स्थानिक प्रशासना कडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ दिनांक २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमा अंतर्गत अधिसूचित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. नागरी संस्थामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधा पैकी नागरिक केंद्र बिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोक सेवेचा जास्तीत जास्त फायदा घेतला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम ३ (अ) नुसार अधिसूचित करण्या बाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र. क्र.१८९/नवि १४, दिनांक-२६/०६/२०१५ नुसार मा. शासनाने निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयामंध्ये नमूद केल्या नुसार एकूण ७४ सेवा स्थानिक प्रधिकरणाने अध्यादेशाचे कलम ३ (अ) नुसार अधिसूचित कारवायाच्या आहेत. परंतू त्यापैकी ०४ सेवा ह्या सामाईक आहेत. व त्यापैकी ०३ सेवा या फक्त महानगरपालिका यांना लागू असल्याने नगर परिषद दिग्रस कडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवाची संख्या ६७ इतकी होती. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ कलम ३ अन्वये सदर ६७ लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, फी, नियतकाल मर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णया द्वारे विहित केल्याची यादी, https//mahaulb.in/MahaULB/home/ulblist/viewmore या वेब पोर्टलवर व नगर परिषद दिग्रसच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद दिग्रस**

...र कार्यालय, सी-२६, औद्योगिक वसाहत, सातूर्णा, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०५ (महा) येथे प्रकाशित केले.
...२९६ Email: dmatadar@gmail.com
...dnera Road, Amravati-444605 (M.S) and Published at Vidarbha Matadar office,
...Contact: 9422855493 Email: dmatadar@gmail.com